**सर्वप्राथम्य/तात्काळ**

**क्रमांक- जमीन-२०१८/प्र.क्र.२८/ज-१**
महसूल व वन विभाग, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- १८.०१.२०१९.**

प्रति,

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय आयुक्त.
३) सर्व जिल्हाधिकारी

विषय:- महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) **नियम, १९७१ च्या नियम ७ मध्ये सुधारणा करण्याकरिता शासन राजपत्रात पुर्व प्रसिध्द केलेली सुधारणा आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच स्थानिक दोन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात, शासन राजपत्रात शुक्रवार, दिनांक ११ जानेवारी,२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या मराठी आणि इंग्रजी भाषेतील नियमांच्या अधिसूचनेची प्रत या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच, सुलभ संदर्भाकरीता सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashtara.gov या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आली आहे.

०२. सदर अधिसूचनेस **दोन स्थानिक वृत्तपत्रात** व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, तसेच, **या अधिसूचनेची प्रत आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर** देखील प्रसिध्द करण्यात **यावी, ही विनंती.**

**(राजेंद्र क्षीरसागर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग,
२.सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, (महसूल), महसूल व वन विभाग.
३.निवडनस्ती (ज-१)

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक ८] शुक्रवार, जानेवारी ११, २०१९/पौष २१, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १५

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन. २०१८/प्र.क्र.९१ /ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८ च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (चार), (दहा), (चौदा) आणि (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजले आहे, त्या नियमांचा पुढील मसूदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी त्याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसूदा दिनांक ११ फेब्रुवारी २०१९ किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकास अथवा त्यापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

## नियमांचा मसुदा

या नियमांना, “महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) (सुधारणा) नियम २०१८” असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ७ च्या पोट-नियम (२) नंतर लप्रमाणे पोट-नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

“(३) (अ) राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून पोट-नियम (१) अन्वये अथवा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या जमीन महसूल विषयक कोणत्याही विधिच्या उपबंधान्वये अथवा अन्यथा, क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा, या प्रयोजनासाठी एक रुपया (रु. १) या नाममात्र दराने अथवा सवलतीच्या दराने वार्षिक भुईभाडे आकारून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण मूळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तींच्या अधीन राहून, अशा जमिनीवरील भाडेपट्ट्यांचे ३० वर्षे इतक्या कालावधीपर्यंत, महाराष्ट्र मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजार मूल्य ठरवणे) नियम, १९९५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार अशा जमिनीच्या येणाऱ्या मुल्यांकनाच्या दहा टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाड्याची रक्कम म्हणून आकारून नूतनीकरण करण्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम राहतील :

परंतु, बृहन्मुंबई क्षेत्रातील अशा भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण राज्यशासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय जिल्हाधिकारी यांना करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, संबंधित भाडेपट्टाधारकाने अशा भाडेपट्ट्यातील अटी व शर्तीचा भंग केला असल्याचे निदर्शनास आल्यास, अशा भाडेपट्ट्याचे नूतनीकरण, राज्यशासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय संबंधित जिल्हाधिकारी यांना करता येणार नाही.

(ब) या नियमांमधील तरतुदीनुसार किंवा अन्यथा, क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा यांच्या उभारणीसाठी एक रुपया (रु. १) या नाममात्र दराने वार्षिक भुईभाडे आकारून अथवा सवलतीच्या दराने भुईभाडे आकारून भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, जर संबंधित शासकीय जमीन शासनास अथवा शासनाच्या नामनिर्देशित कोणत्याही शासकीय यंत्रणांना, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनार्थ अथवा सार्वजनिक प्रकल्पाकरिता आवश्यक असेल, तर अशी जमीन परत ताब्यात घेण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील आणि अशा जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणे जिल्हाधिकाऱ्यास किंवा राज्य शासनास बंधनकारक राहणार नाही.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.